महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 25 /२०२४ दि. २८/०२/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

*****

**ज्याअर्थी,** कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत ढोकाळी–कोलशेत रोडवर कल्पतरू पार्कसिटी **''नमो द सेंट्रल पार्क''** सुरू झालेला आहे. सदर गार्डनमध्ये फिरणेसाठी व गार्डन पहाणे करीता शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवशी मोठया प्रमाणात गर्दी होते. तसेच नागरीकांचे सुमारे २००० ते २५०० इतकी वाहने रस्त्यावर उभी केल्याने सदर भागात गर्दी होवुन, वाहतुक कोंडी होत आहे. तसेच कल्पतरू सोसायटीत राहण्याकरिता रहिवासी आल्यावर वाहनांची संख्या २२०० ऐवढी होणार आहे. पार्कसिटी या ठिकाणी येणारे नागरीकांचे वाहनांकरीता केवळ २०० ते २५० वाहनांचे पार्कींगची व्यवस्था असुन, अन्य वाहने ही पार्कसिटी समोरील सार्वजनिक रोडवर पार्क होत असल्याने नंदीबाबा मंदिर चौक, ढोकाळी नाका, पार्कसिटी, लोढा आमारा व कोलशेत गांव या मार्गावर वाहतुक कोंडी होउ शकते. तसेच ब्रॉडवे ऑटोमोबाईल्स पेट्रोल पंप ते विहंग इन हॉटेल या सेवा रस्त्यावर मलवाहिनी टाकण्यात येणार आहे आणि ड्रेनेज हाऊस कनेक्शन करण्यात येणार आहे. नमूद ठिकाणी खोदकाम करताना सदर रस्ता पूर्णपणे बंद करावा लागणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**ठिकाण –** **१) ढोकाळी–कोलशेत रोडवर कल्पतरू पार्कसिटी '' नमो द सेंट्रल पार्क '' या ठिकाणी शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवशी मोठया प्रमाणात गर्दी होवुन, वाहतुक कोंडी होत असल्याने, सदर मार्गावरून जाणाऱ्या वाहन चालकांनी तसेच पार्कमध्ये येणारे नागरीकांनी खालील प्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करावा.**

**पर्यायी मार्ग –** **अ)** कापुरबावडी सर्कल येथून येणारी वाहने –माजिवडा प्रभाग समिती सिग्नल –बाळकुम नाका सिग्नल –दादलानी पार्ककडे जाणारा चौकातुन ठाणे कडून भिवंडीकडे जाणारे वाहिनीवर पुढे सरळ जावुन डावे बाजूला वळण घेवुन, दोस्ती वेस्ट कॉन्ट्री प्रवेश द्वारातून सरळ जावुन पार्कसिटी गार्डनचे मागील गेट क्रं.३ मार्गे पार्कसिटी ''नमो द सेंट्रल पार्क'' येथे जातील.

**पर्यायी मार्ग –** **ब)** कळवा साकेत मार्गे येणारी वाहने ही बाळकुम नाका सिग्नल येथुन उजवे बाजूस वळण घेवुन,पुढे सरळ जावुन, दादलानी पार्ककडे जाणारा चौकातुन ठाणे कडून भिवंडीकडे जाणारे वाहिनीवर पुढे सरळ जावुन डावे बाजूला वळण घेवुन, दोस्ती वेस्ट कॉन्ट्री प्रवेश द्वारातून सरळ जावुन पार्कसिटी गार्डनचे मागील गेट क्रं.३ मार्गे पार्कसिटी '' नमो द सेंट्रल पार्क '' येथे जातील.

**पर्यायी मार्ग –** **क)** काल्हेर–कशेळी–भिवंडी मार्गे येणारी वाहने दादलानी पार्क चौकातून उजवे बाजूस यू टर्न वळण घेवुन–पुढे ठाणे–भिवंडी वाहिनीवरून पुढे सरळ जावुन डावे बाजूला दोस्ती वेस्ट कॉन्ट्री प्रवेश द्वारातून सरळ जावुन पार्कसिटी गार्डनचे मागील गेट क्रं.३ मार्गे पार्कसिटी '' नमो द सेंट्रल पार्क '' येथे जातील.

सदर अधिसूचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
– ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner